The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# संत साहित्य आणि प्रबोधन

कल्पना कल्याण घुगे
(संशोधक विद्यार्थी)
पद्मश्री विखे पाटील मराठी संशोधन केंद्र, प्रवरानगर ता.राहता,जि.अहमदनगर.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र ही थोर संत महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. मध्ययुगीन कालखंडातील संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकोबांपर्यंत महाराष्ट्राला संत परंपरेचा अनमोल असा वसा लाभलेला आहे.पुढे आधुनिक कालखंडात संत गाडगेबाबा,संत तुकडोजी महाराज यांचे ही या संत परंपरेत महत्वपूर्ण असे योगदान आहे.संत साहित्य आणि समाज प्रबोधन यांचा अतुट असा अनुबंध आहे

बुडती हे जन न देखवे डोळा ।
येतो कळवळा म्हणूनिया ॥

संत तुकारामांच्या या अभंग चरणातून संत साहित्य आणि समाज प्रबोधनाच्या परस्परसंबंधाची अनुभूती आपल्याला लक्षात येते.संतांनी आपले संपूर्ण आयुष्य हे समाजासाठी खर्ची केले असून आपल्या वाणी आणि लेखनीचा उपयोग समाजासाठी केलेला आहे. संतांनी ओव्या, अभंग, भारूडे, श्लोक इ.माध्यमातून समाजात सुधारणावादी विचारांची पेरणी करून जनसामान्यांच्या जीवनात मानवतावादी मूल्यांची रूजवणूक केलेली आहे. संतांची लेखणी ही समतावाद प्रस्थापित करणारी असून जनसामान्यांमध्ये जीवनाकडे बघण्याचा डोळस दृष्टीकोन प्राप्त करून देणारी आहे.संतांनी समाजातील समस्यांचा स्वानुभूतीने वेध घेऊन लोकांच्या मनाचा ठाव घेऊन त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न आपल्या लेखणीतून केल्याने संत साहित्य हे लोकांना अधिक जवळचे वाटते.अनिष्ठ रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, विषमता, अस्पृश्यता या दलदलीत फसून बसलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी संतांनी जे प्रबोधनात्मक कार्य केलेले आहे. त्याचे चिंतन आपल्याला 'संत साहित्य आणि प्रबोधन ' या प्रस्तूत शोधनिबंधात पुढीलप्रमाणे करता येईल.

**संत साहित्य संकल्पना**

'संत' हा शब्द संस्कृत आहे.'अस्' म्हणजे 'होणे' या धातूपासून 'होणारा','असणारा' या अर्थाने 'सन' हे रूप तयार झाले. त्याचे बहूवचन 'संत' हे होय.सत्व आणि तत्वहीन समाजात नवतत्वांची रूजवणूक करण्याचं काम करणारी परंपरा अशी संत परंपरेची ओळख आहे.संत म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला संतांच्या रचनांमधूनच मिळते,ते पुढीलप्रमाणे :

१) संत तोचि जगीं । दया क्षमा ज्याचे अंगी ॥
लोभ अहंता नये मना। जगी विरक्त तोचि जाणा॥ - संत मुक्ताबाई

२) ब्रम्हमूर्ती संत जगी अवतरले ।
उध्दरावया आले दीन जनां ॥- संत नामदेव

३) संतांचा तो संग नव्हे भलतैसा । पालटावी दशा तात्काळिका - संत जनाबाई

४) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।
देह कष्टविती उपकारें ॥ - संत तुकाराम

५) तेचि संत,तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठली ।
नेणते काही जादूटोणा । नामस्मरणावाचोनि ॥ - संत निळोबाराय

संत साहित्य हे तत्व प्रधान साहित्य आहे.मध्ययुगीन कालखंडात सामाजीक जीवनपध्दतीत मोठ्या प्रमाणात प्रतिकूलता निर्माण झाली होती.या प्रतिकूलतेमुळे आत्मभान हरवलेल्या समाजाला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवण्यासाठी संतांनी जी साहित्य निर्मिती केली, त्या साहित्य निर्मितीलाच आपल्याला 'संतसाहित्य' म्हणता येईल.मराठी साहित्य परंपरेत 'संत साहित्य' ही एक महत्त्वाची साहित्य परंपरा आहे.संत काव्य,पंत काव्य व तंत काव्य या तीन मराठी साहित्य काव्य परंपरेत 'संत साहित्य ' ही मध्यवर्ती काव्य परंपरा आहे." एकंदरीत कवितेने काय करावे असे जे जे काही आहे,ते ते मध्ययुगाच्या संदर्भात संत काव्याने केले आहे.संत काव्याने मध्ययुगीन काळाच्या संदर्भात उदार असा दृष्टिकोन मराठी समाजाला देऊन मराठी संस्कृती घडविली. म्हणूनच संत कविता ही मराठी काव्य परंपरेतील परिपूर्ण कविता आहे, अस्सल मराठीपणाशी तिचे नाते जुळले आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्त ठरू नये."[१] बा.रं.सुंठणकरांच्या या विधानावरून आपल्याला संत साहित्याची महती लक्षात येते.

**संत साहित्य आणि प्रबोधन**

मध्ययुगीन कालखंडात अनेक संप्रदाय हे उदयास आले.या विविध संप्रदायात निर्माण झालेल्या संतांनी सर्वसामान्य जनतेला समजेल अशा भाषेत साहित्यनिर्मिती करून समाज प्रबोधनाची एक चळवळ निर्माण केली. प्रबोधन ही समाजातील काळानुसार व काळाला अनुरूप आचार, विचारात परिवर्तन घडवून आणण्याची चिरंतर चालणारी प्रक्रिया आहे.संत साहित्य हे सामाजीक परिवर्तनाचा ध्यास घेऊन संतांनी निर्माण केलेले साहित्य असल्याकारणाने संत साहित्यात समाज प्रबोधनाची बीजं आपल्याला दिसून येतात.संत सारस्वतांनी केवळ तत्वचिंतकाची भूमिका बजावलेली नसून 'प्रबोधनकार'ही भूमिका सुध्दा सार्थ निभावलेली आहे.सामाजीक स्वास्थ्याला अहितकारक ठरणा-या गोष्टी वर प्रहार करून समाजाला खडबडून जागे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संतांनी केलेले आहेअवघ्या महाराष्ट्राचे वैभव असणाऱ्या या संत परंपरेत संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत एकनाथ,संत तुकाराम,संत चोखामेळा,संत नरहरी सोनार, संत कर्ममेळा,संत जनाबाई,संत मुक्ताबाई,संत सोयराबाई,संत

कान्होपात्रा,संत निळोबाराय,संत रामदास,संत बहिणाबाई इ.संतांचा समावेश होतो.संतांनी आपल्या साहित्यातून कशा प्रकारे समाज प्रबोधन केले याचा परामर्श आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येईल.

संत सारस्वतांच्या प्रबोधनात्मक विचारांची मांडणी करत असताना वारकरी संप्रदायाचा पाया रचून जगाची आई 'ज्ञानेश्वरी' लिहिणारे व मानवतावादाचे सार पसायदानातून मांडणारे संत ज्ञानेश्वर यांचे प्रबोधनात्मक विचार लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम संस्कृतीमधील ज्ञान प्राकृत भाषेत आणून सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत साहित्य निर्मितीस प्रारंभ केला.सुरूवातीच्या काळात जातीभेद हा सर्वत्र बोकाळला होता.माणसांना माणसांचा विटाळ होत असल्याने समाजातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्णातील लोकांना अतिशय हीन दर्जाची वागणूक ही उच्च वर्णीयांकडून दिली जायची.समाजाकडून प्रचंड अवहेलना व मनस्ताप सहन करून देखील ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरीमध्ये' मानवतावाद हा धागा पकडून अवघ्या विश्वाला एका धाग्यात एकत्र गुंफण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेअस्पृश्यता,भेदभाव, उच्चनीचता इत्यादी अनिष्ट व निर्थक गोष्टींना बाजूला सारून समाजाला मानवतेचे महत्त्व सांगताना ज्ञानेश्वरांनी लिहून ठेवले आहे की,

"नाना बुडवयाते सुकरणु । न पुसे अंत्यजुकी ब्राम्हण ॥
काढुनि राखे प्राणू । हेंचि जाणे ॥"[२]
(ज्ञा.अ.१६,ओ.१४३)

बुडणाऱ्याला वाचवणारा व्यक्ती हा जर दयावान असेल तर तो बुडणाऱ्याला वाचवताना तो ब्राम्हण आहे कि अत्यंज हे न पाहता जातीयतेला फाटा देऊन माणुसकीचे नाते जपत असतो.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचल्यानंतर वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन,
नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।
असे म्हणत महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम करणारे थोर संत म्हणजे 'संत नामदेव' होय.संत नामदेवांनी आपल्या कीर्तन व अभंग रचनांमधून विठ्ठल भक्तीबरोबरच लोकजागृती करण्याचे काम केलेसमता प्रस्थापित करायची असेल तर समाजातील अठरापगड जाती-धर्मातील लोकांना सोबत घेणे गरजेचे आहे,हे लक्षात घेऊन संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे,संत सावतामाळी संत नरहरी सोनार,संत सेना न्हावी,संत गोरोबा काका,संत चोखामेळा,संत बंका,संत जनाबाई या सर्व संतांना सोबत घेऊन समतावाद प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेसंत नामदेवांनी वारकरी संप्रदायातील सर्व संतांना चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र आणून समाजासमोर जो आदर्श निर्माण केला होता तो आदर्श फक्त धार्मिकतेचा आदर्श नसून त्यातून समाजाला समतावादाचे बाळकडू मिळाले होतेसंतांच्या या सामाजिक कार्याकडे नजरेत विशाल दृष्टिकोन ठेवून पाहिले असता त्या काळात समाजात एकता नांदावी यासाठी वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी मिळून निर्माण केलेले हे एक सामाजिक आंदोलन होते,अशी खात्री पटते.या संदर्भात डॉ. भालचंद्र नेमाडे अतिशय समर्पक मत मांडतात की, " वारक-यांच्या आंदोलनाकडे केवळ धार्मिक आंदोलन म्हणुन बघणे चुकीचे आहेकारण या आंदोलनातील नेत्यांचा प्रमुख उद्देश फोफावत

चाललेल्या दृष्ट सामाजिक प्रवृत्तीचे उन्मूलन करणे हा होता त्यांनी जीवनाच्या ऐहिक आणि आध्यात्मिक अशा दोन्हीही बाजूंसाठी उपयुक्त अंशी आचारसंहिता प्रशंसलीवंश, समूह, जाती,उपजाती, वर्ण, पंथ, धार्मिक कडवेपणा इत्यादी तमाम गोष्टी एका विशाल सामाजिक एकतेत विरघळून जातील असे वातावरण संतांनी एकत्रितपणे निर्माण केले."[३]

संत परंपरेचा दुसरा कालखंड म्हणजे संत एकनाथांचा कालखंड होय! संत ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम निर्मिती केलेल्या 'भारूड' या पद्यवाङ्मय प्रकाराला शिखरावर नेऊन पोहचवण्याचे कार्य संत एकनाथांनी केले.भारूडात लोकसंवाद असल्याने थेट लोकांच्या हृदयाला भिडण्याचे सामर्थ्य या साहित्य प्रकारात आहे.संत एकनाथांनी भारूडातून लोकजीवनातील दाखले देऊन समाज प्रबोधन प्रभावी रीतीने केले.भारूडाविषयी. "भारूडात अद्भूतपणा असतोसमाजातील चालीरीतींवर टीका असते व बोधही असतो.बोधाचा कडवेपणा नसतो,तर खेळीमेळीने वागताना मनोरंजनाबरोबर बोध केलेला असतो."[४] ल.रा.पांगारकर यांच्या भारूडाविषयीच्या या विवेचनावरून लक्षात येते की भारूड हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे.संत एकनाथांनी भारूडामध्ये वासुदेव, गोंधळी,पोतराज,पिंगळा,जोगी,इ.लोकभूमिकांचे माध्यम वापरले.तसेच वेगवेगळे खेळ,पशू- प्राणी भारूडात उपयोगात आणून 'रूपक' पध्दतीने भारूडे लिहिली.या भारूडांच्या माध्यमातून एकनाथांनी समाजाला 'सदाचार आणि नीती' चे शिक्षण दिले त्याचबरोबर 'विवेकाचा' जागर करून दृष्ट प्रवृतीवर प्रहार करण्याचे काम केले.

सामाजिक प्रबोधनासाठी संत एकनाथांनी भारूडाबरोबर एकनाथी भागवत,चतु:श्लोकी भागवत, रूक्मिणी स्वंयवर,अभंग,गौळणी इ.रचना केली.या सजीवसृष्टीमधील सर्व भूतांमध्ये प्राण्यांमध्ये, वनस्पतींमध्ये कोणताही भेद नसून सर्वांना समानतेने पाहायला हवे,हा एकात्मतेचा संदेश देत असताना संत एकनाथ म्हणतात,

"जो सर्व भूतांचे ठायी । निरंतर अंतर नाही ॥
समसाम्ये सर्वदा पाही । उणा पूरा कदाहीं कल्पांती नव्हे ॥"[५]

संत परंपरेतील संत एकनाथानंतर येणारा कालखंड म्हणजे संत तुकाराम कालखंड होय. संत तुकाराम कालीन कालखंडात संत ज्ञानेश्वरांनी पाया घातलेल्या वारकरी संप्रदायाची उंची संत तुकारामांच्या योगदानाने कळसाला जाऊन पोहोचली होती.सर्वांना सामावून घेण्याची शिकवण ही 'वारकरी संप्रदाया' ची होती.अखंड विश्व कल्याणाचे सार या संप्रदायाच्या विचारधारेत सामावलेले होते.संत तुकाराम कालीन समाज हा धार्मिकतेच्या नावाखाली अगदी होरपळून निघाला होता.जप-तप,तंत्र-मंत्र, व्रतवैकल्य,होम-हवन इ.कचाट्यात समाज सापडलेला होता.

"धर्मांचें पालन। करणें पाखांड खंडण ॥१॥
हेंचि आम्हां करणें काम। बीज वाढवावें नाम ॥२ ॥
तीक्ष्ण उत्तरें। हातीं घेउनि बाण फिरे ॥३॥
नाहीं भीड भार। तुका म्हणे सान थोर ॥४॥[६]

(तु.गा.अ. क्र.२१३६)

धर्माचे पालन करणे म्हणजे समाजातील धार्मिक बाबतीत निर्माण झालेले ढोंग यांचा नाश करणे होय.या पाखंडाचा नाश करण्यासाठी हरिनामाचा प्रचार-प्रसार करणे हे आमचे कर्म आहे.धार्मिकतेबाबत नाहक स्तोम माजवणा-यांना शब्दांच्या स्वरूपात बाणाप्रमाणे उत्तरें दिली जातील.हे कार्य करताना कोणी लहान असो वा मोठा,आम्ही कोणाची ही भीड राखत नाहीत.या पध्दतीने संत तुकाराम धार्मिकतेबाबतचे माजलेले स्तोम नाहीसे करण्यासाठी अत्यंत साध्या-सोप्या शब्दांत वर्णन करतात.धर्माच्या नावाखाली उच्चवर्णियांनी हिरावून घेतलेले हक्क समस्त समाजातील लोकांना मिळवून देण्यासाठी संत तुकारामांना व्यवस्थेविरुद्ध झगडावे लागले.

"अवघी एकचि वीण । तेथें कैचें भिन्नाभिन्न ॥"[७]

(तु.गा.अ.क्र. ३५४)

संत तुकारामांच्या या वरील चरणाप्रमाणे सर्व मानवजात ही एकच असून त्यात भिन्नता ती कसली ? संत तुकारामांच्या या समतेच्या संदर्भात रमेश काकुळते यांनी एक विचार मांडला आहे,तो असा की,"वर्ण शुद्र (धर्मशास्त्रानुसार) पण तुकाराम महाराज तो वर्णच नाकारतात म्हणून शुद्राचा विषयच निर्माण होत नाही.तुकोबा जर वर्ण नाकारत असतील,तर आपल्याला वर्णाभिमान बाळगण्याचा अधिकार नाही."[८] अशाप्रकारे संत तुकारामांच्या एकात्मतेच्या, समतेच्या दृष्टीचा वेध घेऊन लेखकाने मांडलेल्या या विचार करत असताना संत तुकारामांचा समतावादी दृष्टीकोन आपल्या लक्षात येतो.

**समारोप**

संत साहित्य आणि प्रबोधन या विषयावर वरीलप्रमाणे विस्तृत चिंतन केल्यानंतर यातून हा मतितार्थ निघतो की,संत परंपरेतील सर्वच संतांनी आपल्या साहित्यातून समाजाचे हित लक्षात घेऊन सामाजीक विकासाला अडसर ठरणा-या गोष्टींना नाकारून समाजात प्रबोधनात्मक कार्य केलेले आहे.संताचे हे प्रबोधनात्मक विचार त्रिकालाबाधित सत्य असून समाजाला तारणारे आहेत.

**संदर्भ**

१) सुंठणकर बा.रं.,'महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य',लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई,तिसरी आवृत्ती २००८,पृ.११.

२)कुंटे अ.मो व पणशीकर वा.ल.(संपा),' श्रीज्ञानेश्वरी', श्रीवामनराज प्रकाशन,पुणे, तिसरी आवृत्ती २०१२,अ.१६,ओ.१४३.

३) नेमाडे भालचंद्र,'तुकाराम', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,दुसरी आवृत्ती २०१८,पृ.२९.

४) कुलकर्णी मदन,' श्री एकनाथ महाराजांची भारूडे : संहिता व समीक्षा', पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती १९९८,पृ.५.

५) एकनाथी भागवत,गीताप्रेस, गोरखपूर,अकरावी आवृत्ती,अ.५,ओ.१९२.

६) लाड पु.म.(संपा),'श्रीतुकारामबावांच्या अभंगांची गाथा,सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,दुसरी आवृत्ती १९५५,पुनर्मुद्रण २०११,तु.गाथा.अ. क्र.२१३६,पृ.३६७.

७) तत्रैव,तु.गाथा.अ.क्र.३५४.पृ.५८.

८) काकुळते रमेश,'स्वंयभू संत तुकाराम महाराज', पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद,पहिली आवृत्ती २०१५,पृ.२३.